श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

एप्रिल २०२५ | वर्ष – १३ अंक – ४ | मासिक, पाने १२ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## बजाज फिन्सर्व्हचे श्री. कुरुष इराणी यांची डेरवण रुग्णालयाला भेट



*डावीकडून – स्वप्ना वझलवार, शुभांगी बोचरे, डॉ. सुवर्णा पाटील, सोहम धापटे, कुरुष इराणी, ज्योती अय्यर आणि डॉ. नेताजी पाटील*

बजाज फिन्सर्व्हचे श्री. कुरुष इराणी,((President CSR), श्रीमती शुभांगी बोचरे (Deputy National Lead, CSR), श्री. सोहम धापटे (Senior manager, CSR) आणि श्रीमती स्वप्ना वझलवार (Senior Lead, CSR Communications) यांनी दि. १७ आणि १८ एप्रिल २०२५ रोजी डेरवण शैक्षणिक परिसराला भेट दिली. बजाज फिन्सर्व्हने 'सामुहिक सामाजिक दायित्व' (CSR) या योजनेद्वारे केलेल्या आर्थिक मदतीतून सुरू असलेल्या कामाची पाहणी करणे आणि या योजनेद्वारे आरोग्य शिक्षण घेणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांशी संवाद करणे यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली होती.

२०२४–२५ या आर्थिक वर्षात बजाज फिन्सर्व्हने १६५ विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक शुल्क आणि निवास भोजनाचे शुल्क यासाठी मदत केली. या लाभार्थींमध्ये परिचारिका (ANM, GNM, BSc nursing, PB BSc, MSc), संलग्न वैद्यकीय सेवा अभ्यासक्रम (OT technician, Hemodialysis technician), वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रगत पदविका Advanced Diploma in Medical Lab Technician (ADMLT), आहारशास्त्र पदविका, जैववैद्यकीय अभियांत्रिकी (Biomedical engineering) आणि संलग्न वैद्यकीय सेवा पदवी (BSc in Paramedical Technology) यांचा समावेश आहे.

याबाबतीत आपले विचार व्यक्त करताना श्री. कुरुष इराणी, (President CSR), यांनी या कार्याची व्यापकता आणि त्याचा ग्रामीण जनतेवर झालेला परिणाम याविषयी संतोष व्यक्त केला. आरोग्यक्षेत्रातील समस्यांचे उत्तर शोधण्याच्या ट्रस्टच्या दृष्टिकोनामुळे समस्यांचे नेमके स्वरूप लक्षात घेऊन त्यांचे निराकरण करणे आणि ट्रस्टच्या अगदी शेवटच्या स्तरातील कर्मचाऱ्यांपर्यंत हा दृष्टिकोन रुजविणे यामुळे ते विशेष प्रभावित झाले. ''दोष त्यांचा नाही जे शतकानुशतकांच्या अंधश्रद्धांमुळे

दु:ख भोगतात. दोष त्यांचा आहे ज्यांना हे माहीत असूनही जे ते कमी करण्यासाठी काहीही करीत नाहीत.'' या दीपस्तंभाप्रमाणे असलेल्या संस्थेच्या ध्येयवाक्याच्या तर ते प्रेमातच पडले! ज्यांच्यामुळे एवढे प्रचंड कार्य शक्य झाले आहे त्या संस्थेच्या अनुभवी डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांचेही त्यांनी कौतुक केले. 'ड्रिम हेल्थ पार्क'सह येथील सर्वच संसाधनांचा उच्च दर्जा आणि उत्कृष्ट निर्मितीचे त्यांनी भरभरून कौतुक केले. व्यवस्थापन कौशल्य आणि सुस्पष्ट दृष्टिकोन यांच्या जोरावर ना नफा-ना तोटा तत्त्वावर अखंडपणे चालणारी अशी सेवाभावी संस्था आपण प्रथमच पाहत आहोत असेही ते म्हणाले.

कर्मचारी, विद्यार्थी आदींना भेटून-बोलून तसेच संस्थेच्या सर्व शाखोपशाखा पाहून, ते शैक्षणिक गुणवत्ता, संसाधने, अध्यापन कौशल्य, शिस्त, आरोग्य सेवेतील कौशल्य आणि अध्यापन याचे व्यवस्थापन पाहून ते अत्यंत प्रभावित झाले.



*लाभार्थी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना बजाज फिन्सर्व्हचे प्रतिनिधी*

आपले ट्रस्टबरोबरचे नाते दीर्घ काळ असेच सौहार्दाचे राहावे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. सर्वच पाहुण्यांनी आदरातिथ्य आणि सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. अगदी घरीच असल्यासारखे वाटत होते अशी प्रतिक्रियाही त्यांनी अनौपचारिकपणे व्यक्त केली.

# वालावलकर रुग्णालयात श्वसनरोगासाठी अद्ययावत अतिदक्षता विभागाचे उद्घाटन



*श्वसनरोगासाठी अद्ययावत अतिदक्षता विभाग*

दि. ३० मार्च २०२५ रोजी भ. क. ल. वालावलकर रुग्णालय, डेरवण येथे श्वसन अतिदक्षता विभागाच्या नवीन वास्तूच्या उद्घाटनाचा सोहळा पार पडला.

आजकालच्या प्रदूषणयुक्त वातावरणामुळे श्वसन विकारांचे प्रमाण फार वाढले आहे. त्यामुळे श्वसन विकाराने गंभीर आजारी पडण्याचे प्रकारही वाढले आहेत. त्यामुळे अत्यवस्थ अवस्थेत दाखल झाल्यास रुग्णाला तातडीची सेवा मिळणे, तसेच ती त्याला आर्थिकदृष्ट्या परवडणे ह्या बाबींचा विचार करून वालावलकर रुग्णालयाने कोंकणवासियांना महात्मा फुले योजनेचा योग्य लाभ मिळावा आणि गंभीर रुग्णांचे जीव वाचावेत याकरिता श्वसन अतिदक्षता विभाग सुरू केला आहे.

या प्रसंगी डॉ. नेताजी पाटील, डॉ. अमेय परांजपे तसेच रुग्णालयातील निवासी डॉक्टर्स, सिस्टर नर्सेस व इतर स्टाफ उपस्थित होते. सर्व आधुनिक सोयी सुविधांनी सज्ज (व्हेंटिलेटर्स, इन्फ्युजन पंप, मॉनिटर्स, रक्तातील प्राणवायू आणि कार्बन-डाय-ऑक्साइड मोजण्याचे यंत्र, आर्टेरिअल ब्लड-प्रेशर, लंग फंक्शन इत्यादी) अशा या १२ बेडच्या अतिदक्षता विभागमध्ये दमा, छातीत हवा भरणे, टीबी, न्युमोनिया, पल्मोनरी हायपरटेन्शन, लंग डिसीज, श्वसनक्रिया बंद होणे इ. सर्व प्रकारच्या तातडीच्या आणि

गंभीर आजारांवर उपचार करणे सोपे होईल.

वातानुकूलित प्रशस्त आणि सुसज्ज असा अतिदक्षता विभाग केवळ श्वसन आजार असणाऱ्या रुग्णांसाठी खुला केला आहे. प्रत्येक बेडसाठी सेंट्रल ऑक्सिजन एअर सक्शनची सोय आहे. या शिवाय 'शिल्लर' कंपनीच्या व्हेंटिलेटरमुळे दम लागलेल्या आणि श्वसनाला अडथळा असलेल्या रुग्णांना कृत्रिम श्वास देता येणार आहे. सोबत फुफ्फुसांच्या रक्तवाहिन्यांची अँजिओग्राफी करण्याची तसेच गरज पडल्यास दुर्बिणीद्वारे श्वसनमार्गाची ब्राँकोस्कोपी देखील करता येणार आहे. हृदयाची कार्यक्षमता पाहण्यासाठी इको-कार्डिओग्राफीची सोय केली आहे. न्युमोनियाचे लवकर निदान होण्याकरता उच्च दर्जाचे यंत्र आणि उच्चशिक्षित श्वसनविकार तज्ज्ञ डॉक्टर आणि परिचारिका यांचे नियोजन करण्यात आले आहे. रत्नागिरी जिल्हा तसेच कोकणातील दुर्गम भागातील ज्या रुग्णांना फुफ्फुसाचे /श्वसनाचे गंभीर स्वरूपाचे आजार असतील त्यांना वालावलकर रुग्णालयातील या सुविधांचा निश्चितच लाभ घेता येईल.

## वालावलकर हॉस्पिटलमध्ये कान, नाक, घसा विभागाचे 'सायनस'वरील सलग दुसरे शिबिर यशस्विरीत्या संपन्न




दि. ८ व ९ मार्च २०२५ रोजी वालावलकर हॉस्पिटलच्या कान, नाक, घसा विभागाच्यावतीने दुर्बिणीद्वारे 'सायनस सर्जरी कॅडेव्हेरिक कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत १८ कान, नाक, घसा शल्यविशारदांना सायनसवरील आजारांच्या शस्त्रक्रियेचे प्रशिक्षण तज्ज्ञ डॉक्टरांकडून देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी १० कॅडॅव्हर्स वापरण्यात आली. कान, नाक, घसा शल्यविशारदांनी या कॅडेव्हेरिक बॉडीजवर शस्त्रक्रिया करून सायनसवरील शस्त्रक्रियांमध्ये निपुणता मिळवली. हे प्रशिक्षण घेण्यासाठी मुंबई, पुणे, सांगली, मिरज, नांदेड, रत्नागिरी येथील शल्यविशारद सहभागी झाले होते.

प्रशिक्षण देण्यासाठी शताब्दी हॉस्पिटल, कांदिवली, मुंबई येथील प्रख्यात कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. राजेश यादव, कूपर रुग्णालय, मुंबई येथून प्रोफेसर डॉ. शशिकांत मशाल, कुर्ला भाभा हॉस्पिटल, मुंबई येथून डॉ. तृप्ती गडकरी आणि भारती विद्यापीठ, पुणे येथील प्रोफेसर डॉ. प्रसून मिश्रा, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, पुणे येथून डॉ. परेश चव्हाण आणि भारती विद्यापीठ, सांगली येथून डॉ. सचिन निलाखे हे दिग्गज शल्यविशारद प्रशिक्षणासाठी उपस्थित होते.

या शिबिरासाठी लागणारी एंडोस्कोपिक सिस्टिम, कॅमेरा, दुर्बिणी, डेब्रीडर, ड्रिल इ. यंत्रसामग्री वालावलकर रुग्णालयात उपलब्ध असल्याने प्रशिक्षण सुलभ झाले. या

विच्छेदन कार्यशाळेसाठी शस्त्रक्रिया गृहात जशी व्यवस्था केली जाते अगदी तशीच सर्व सोय टेबल्स, कॅमेरा, लाईट्स, इत्यादी यंत्रणेसह पुरविण्यात आली होती. त्यामुळे सहभागी डॉक्टर्सना आपण जिवंत रुग्णावरच शस्त्रक्रिया करत आहोत असे भासत होते. संतोष सर्जिकल्स, कोळंबकर, सर्वेल, युनिव्ह लॅब्स आणि मेडट्रॉनिक सारख्या ई. एन. टी.शी संबंधित अनेक उत्पादक आणि विक्रेत्यांनी ही उपकरणे उपलब्ध केली होती.

ह्या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजेच सॉफ्ट एम्बलमेड कॅडॅव्हर्स (Soft - embalmed cadavers). मृतदेह एक विशिष्ट द्रावण वापरल्यामुळे मऊ राहते आणि त्यामुळे शल्यविशारदांना शिकायला सोपे जात होते. अशा प्रकारचे कॅडॅव्हर्स महाराष्ट्रात कुठेही उपलब्ध नाहीत. हे विशेष असे कॅडॅव्हर्स उपलब्ध करून देण्याचे काम डॉ. प्रशांत मूल्या, प्रोफेसर शरीरशास्त्र विभाग, भ.क.ल. वालावलकर मेडिकल कॉलेज यांनी केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी वालावलकर हॉस्पिटलमधील कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. राजीव केणी आणि डॉ. प्रतीक शहाणे यांनी अहोरात्र मेहनत घेतली आणि त्यांना डॉ. धरणगुटे, डॉ. संदीप साठे, डॉ. नेताजी पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## डेरवण रुग्णालयामध्ये अत्याधुनिक फ्लो साइटोमेट्री सुविधा उपलब्ध




आधुनिक तंत्रज्ञान आणि अचूक निदानासाठी वालावलकर रुग्णालय कायमच अग्रेसर असते आणि सतत नवनवीन तंत्रज्ञान कोकणवासीयांच्या उपचारासाठी उपलब्ध व्हावे ह्याच तळमळीतून 'फ्लो सायटोमेट्री'सारखी अद्ययावत सुविधा सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे रक्ताच्या नमुन्यातून अनेक प्रकारच्या आजारांचे निदान शक्य होणार आहे. उदाहरणार्थ रक्तातील पेशींचे वर्गीकरण, रक्तविकारांचे (हेमॅटोलॉजिकल), कॅन्सरसारख्या आजारांचे निदान आणि इम्युनोफेनोटाइपिंग तसेच एचआयव्ही बाधित रुग्णांची सी डी ४ पेशींची संख्या इ. यामुळे रुग्णाच्या प्रतिकारशक्तीचे मूल्यमापन करून योग्य औषधांची निवड करणे शक्य होणार आहे. सी डी ४ संख्या अधिक कार्यक्षम व अचूक मिळणार आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन परिणाम अधिक जलद मिळू शकतात प्रतिकारशक्तीशी (इम्यून डिसॉर्डर्स) निगडित आजारांचे अचूक निदान होऊ शकते.

विविध विषयांच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अचूक निदान करणारे हे कोकणातील एकमेव तंत्रज्ञान रुग्णांसाठी खुले करण्यात आले आहे. 'रमा पुरुषोत्तम फौंडेशन' ह्या सेवाभावी संस्थेने या सुविधेसाठी भरघोस मदत देऊन सामाजिक भान जपले आहे. ही सुविधा एका वातानुकूलित कक्षामध्ये स्थापन करून शास्त्रज्ञ डॉ. ऋता मुल्हेरकर जातीने या मशीनच्या संशोधनासाठीच्या उपयोगीतेवर लक्ष ठेवणार आहेत.

# समर्थ नर्सिंग कॉलेज, डेरवणच्या विद्यार्थ्यांनी काढली जागतिक कुष्ठरोगदिनानिमित्त जनजागृती मोहीम



*चिपळूण बाजारपेठेत जनजागृती मोहीम*



*चिपळूण बस स्थानकावर जनजागृती मोहीम*

समर्थ नर्सिंग कॉलेज, डेरवण येथील जी.एन.एम. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी जागतिक कुष्ठरोगदिन जनतेला एकत्र जमवून मोठ्या प्रमाणात चिपळूण येथे जनजागृती केली. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना कॉलेजचे शिक्षकवर्ग, चिपळूण तालुक्याचे आरोग्य अधिकारी, आरोग्य साहाय्यक, अर्बन हेल्थ सेंटर चिपळूण येथील कर्मचारी आणि डॉ. रविकिरण सर, साहाय्यक प्राध्यापक, भ. क. ल. वालावलकर रुग्णालय यांनी उत्तम मार्गदर्शन केले. या दिनानिमित्त जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांनी चिपळूण भाजी मंडई आणि चिपळूण एस. टी. स्टॅन्डजवळ घोषणा देत लोकांना जमवून त्यांच्यासमोर एक पथनाट्य सादर केले.

या पथनाट्यासाठी चिपळूण तालुक्याचे आरोग्य अधिकारी, आरोग्य साहाय्यक तसेच अर्बन हेल्थ सेंटर चिपळूण येथील डॉक्टर्ससुद्धा उपस्थित होते. नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या पथनाट्यात समाजात कुष्ठरोगाबद्दल असलेल्या अंधश्रद्धा, कुष्ठरोगाबाबत लोकांचे असलेले गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यावरील उपाय तसेच उपलब्ध असलेले विविध उपचार याबद्दल प्रबोधन केले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात नागरिकांनी हजेरी लावली आणि उत्तम प्रतिसाद दिला. शेवटी कुष्ठरोगाविषयी घोषणा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली आणि विद्यार्थ्यांनी सर्व उपस्थित मंडळींचे आभार व्यक्त केले.

# समर्थ नर्सिंग कॉलेज, डेरवण येथे जागतिक कर्करोगदिनाचे आयोजन





*प्रो. शिवप्रसाद हलेमनी यांच्या हस्ते धावण्याच्या स्पर्धेचे उद्घाटन*




*दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ*

समर्थ नर्सिंग कॉलेज, डेरवण, सावर्डे येथील नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी दि. ०४ फेब्रुवारी २०२५ रोजी जागतिक कर्करोगदिन साजरा केला. या कर्करोगदिनानिमित्त आंतरमहाविद्यालयीन चार किलोमीटर धावण्याची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये समर्थ नर्सिंग कॉलेज आणि एम.ई.एस. नर्सिंग कॉलेज, लोटे यामधील विद्यार्थी आणि अध्यापक सहभागी झाले होते. ही स्पर्धा एसव्हीजेसीटी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स ते डेरवण फाटा आणि परत एसव्हीजेसीटी स्पार्ट्स कॉम्प्लेक्स अशा प्रकारे घेण्यात आली.

या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून एम.ई.एस. नर्सिंग कॉलेजचे उपप्राचार्य प्रोफेसर शिवप्रसाद हलेमनी उपस्थित होते.




*कर्करोगातून बरे झालेले रुग्ण श्री. राकेश गावनंगे आपले मनोगत मांडताना*




*कर्करोगदिनानिमित्त विद्यार्थ्यांनीही आपले विचार मांडले*

स्पर्धेची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून झाली आणि समर्थ नर्सिंग कॉलेजच्या उपप्राचार्या प्रोफेसर तेजल सुर्वे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले तसेच विद्यार्थ्यांनी क्रीडाज्योत फिरविली. त्यानंतर विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम सांगण्यात आले आणि स्पर्धा सुरु झाली. यामध्ये दोन मुली आणि २ मुले तसेच एक अध्यापक असे विजयी घोषित करण्यात आले आणि त्यांना प्रशस्तिपत्र, पदक तसेच पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

कर्करोगदिनानिमित्त कर्करोगपीडित रुग्णांना बोलवून मार्गदर्शन करण्यात आले आणि या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कर्करोगातून बरे झालेले रुग्ण श्री. राकेश गावनंगे यांना बोलविण्यात आले होते. समर्थ नर्सिंग कॉलेजच्या उपप्राचार्या प्रोफेसर तेजल सुर्वे यांनी त्यांचे आणि उपस्थित असलेल्या सर्व रुग्णांचे फूल देऊन स्वागत करण्यात आले.

नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या भाषणांमधून कर्करोगाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. श्री. राकेश गावनंगे यांनी स्वतःचा अनुभव इतर रुग्णांसमोर मांडला. यामुळे त्यांना कर्करोगावर मात करण्यासाठी मार्गदर्शन मिळाले. हा कार्यक्रम जी.एन.एम. दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रोफेसर जेसी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्विरीत्या पार पाडला.

## समर्थ नर्सिंग कॉलेज, डेरवणच्या विद्यार्थ्यांनी केला जागतिक महिला दिन साजरा



*आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त उपस्थित सन्माननीय पाहुणे*

सावर्डे, कासारवाडी येथील एस.व्ही.जे.सी.टी.च्या समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये दि. ८ मार्च २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्या प्रा. तेजल सुर्वे, प्रा. जेसी जेकब व सर्व प्राध्यापकांच्या सन्माननीय मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात संपूर्ण महाविद्यालयाने सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाची मांडणी, भाषणांचा क्रम, प्रेरणादायी महिलांचा समावेश असलेली चरित्रनाट्य स्पर्धा यांचे संयोजन निकिता गोमाणे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन करून झाली. सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

दीपप्रज्वलनानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली, तसेच विद्यार्थ्यांनी काव्यवाचन व प्रेरक गीते सादर केली. त्यानंतर प्रेरणादायी महिलांचे दर्शन घडविणारी चरित्रनाट्य स्पर्धा पार पडली. वैशाली दळवी व विनायक ढांगे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले आणि प्रथम तीन स्पर्धकांना गौरविण्यात आले.

तसेच बी.के.एल. वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय तसेच मानसशास्त्र, नर्सिंग व फिजिओथेरपी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कविता, कथाकथन, चारोळी, लोकनृत्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आमच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि अनेक पारितोषिके मिळवली. कार्यक्रमाची सांगता शिक्षिका आकांक्षा मुळ्ये यांच्या प्रेरक भाषणाने झाली आणि त्यांनी पतीच्या उपचारासाठी वयाच्या ६५व्या वर्षी मॅरेथॉन पूर्ण केलेल्या महिलेची प्रेरणादायी कहाणी सांगितली. ही कथा खरोखरच प्रोत्साहक होती. विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. तर जीएनएमच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# समर्थ नर्सिंग कॉलेज, डेरवणच्या विद्यार्थ्यांनी केली जागतिक आरोग्य दिनानिमित्त जनजागृती

एस.व्ही.जे.सी.टी.च्या समर्थ नर्सिंग कॉलेज, कासारवाडी, सावर्डे येथे विद्यार्थी, कर्मचारी आणि समाजबांधवांमध्ये माता व नवजात बालकांच्या आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी दि. ८ एप्रिल २०२५ रोजी जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम निरोगी जीवनाला प्रोत्साहन देणे या जागतिक मोहिमेच्या अनुषंगाने होता. या कार्यक्रमाचे पूर्ण नियोजन बी. एस्सी. नर्सिंग ५व्या सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांनी केले होते आणि या कार्यक्रमांतर्गत त्यांनी अर्बन हेल्थ सेंटर चिपळूण आणि रूरल हेल्थ सेंटर डेरवण येथे एक पथनाट्य सादर केले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११.३० वाजता डॉ. देशमुख यांच्या भाषणाने झाली, त्यांनी सर्व उपस्थित जनतेचे स्वागत केले आणि जागतिक आरोग्य दिनाचे तसेच माता व बाल आरोग्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. या वर्षीच्या थीमची ओळख करून देण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेचा एक छोटा व्हिडिओ दाखविण्यात आला. मातामृत्यू रोखणे, प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात काळजीचे महत्त्व, गरोदर महिला व नवजात बालकांचे पोषण याविषयी त्यांनी भाष्य केले. विद्यार्थी, कर्मचारी आणि समाजबांधवांच्या प्रश्नांनाही त्यांनी उत्तरे दिली.

विद्यार्थ्यांनी जागतिक आरोग्य दिनाच्या थीमवर आधारित कलाकृती आणि पोस्टर प्रेझेंटेशन तयार केले. तसेच पाचव्या सेमिस्टरच्या बी. एस्सी. नर्सिंग विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील महिलांना आरोग्यसेवेबाबत भेडसावणाऱ्या आव्हानांवर प्रकाश टाकणारी नाटिका सादर केली. हा कार्यक्रम डॉ. गजानन वेल्हाळ (कम्युनिटी मेडिसिन विभाग प्रमुख), डॉ. पंकज आणि डॉ. सोनम यांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे संयोजन प्राणाली पांचाळ व आकांक्षा मुळ्ये यांनी केले. या कार्यक्रमामुळे सुमारे १०० सदस्यांमध्ये माता आणि नवजात बालकांच्या आरोग्याविषयी जागृती होण्यास मदत झाली. यामुळे आरोग्यसेवेतील आव्हाने आणि वेळेवर वैद्यकीय मदत आणि चांगल्या पोषणाचे महत्त्व यावर चर्चा करण्यास प्रोत्साहन मिळाले. डॉ. गजानन वेल्हाळ यांनी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या उत्सवात विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.



*पोस्टर सादरीकरण करताना नर्सिंगचे विद्यार्थी*




*माता आणि बालकांच्या आरोग्यावर शिक्षण देताना नर्सिंगचे विद्यार्थी*



*डॉ. गजानन वेल्हाळ, कम्युनिटी मेडिसिन विभागप्रमुख जागतिक आरोग्यदिनानिमित्त संबोधताना*



*प्रेरणादायी महिलांची भूमिका करताना सर्व विद्यार्थी*

# परकीय भाषा दिन – उत्साहात साजरा




*डावीकडून – शरयु यशवंतराव, वैशाली दाबके, प्रमुख पाहुण्या डॉ. पार्वती हळबे, विशेष पाहुण्या अलिसिया पॅद्रोस, डॉ. कृपा कुलकर्णी, प्रज्ञा पारकर*

श्री विठ्ठलराव जोशी चारिटीज्‌ ट्रस्ट इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, येथे बालरोगतज्ज्ञ डॉ. पार्वती हळबे यांच्या प्रमुख उपस्थितीत फॉरेन लँग्वेज डे उत्साहात संपन्न झाला. परकीय भाषा दिनाचे औचित्य साधत, गोएथे-इन्स्टिट्यूट मॅक्स म्युलर भवन पुणेच्या उपसंचालक तसेच भाषा विभाग प्रमुख अलिसिया पॅद्रोस यांनी आमच्या शाळेस सदिच्छा भेट दिली. त्यांच्यासोबत शैक्षणिक सेवा, प्रकल्प व्यवस्थापक वैशाली दाबके व समन्वयक इंद्रजित पवार उपस्थित होते. परकीय भाषा दिनी त्यांच्या भेटीचा योगायोग अत्यंत सुंदर व अर्थपूर्ण ठरला.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले व प्रशालेतील विद्यार्थिनींनी ईशस्तवनाने कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात केली. प्रशालेच्या शिक्षिका प्राची गोखले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. शाळा संचालिका शरयू यशवंतराव यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्या डॉ. पार्वती हळबे यांचा सत्कार तसेच फॉरेन लँग्वेज शिक्षिका डॉ. कृपा कुलकर्णी यांच्या हस्ते अलिसिया पॅद्रोस यांचा सत्कार, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. तर प्रकल्प व्यवस्थापक वैशाली दाबके व समन्वयक इंद्रजित पवार यांचा सत्कार प्रशालेच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर यांच्या हस्ते करण्यात आला.

शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना, या छोट्याशा गावातील शाळेत परकीय भाषा शिकवण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आल्याचे सांगून परदेशी भाषा अध्यापनाचे बीजारोपण १४ वर्षांपूर्वी झाल्याचे नमूद केले. या उपक्रमाची सुरुवात जर्मन भाषेने झाली आणि नंतर स्पॅनिशचा समावेश झाला. आज हे बीज एका समृद्ध कार्यक्रमात रूपांतरित झाले आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना जागतिक संस्कृती समजून घेण्याच्या नव्या संधी मिळाल्या आणि त्यांचं विचारविश्वही व्यापक झालं. विद्यार्थ्यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील भाषापरीक्षांमधील उल्लेखनीय यशामुळे केवळ शैक्षणिकच नाही तर विद्यार्थ्यांना नवीन विश्वं शोधण्याची, वेगवेगळ्या दृष्टिकोनांना समजून घेण्याची आणि जागतिक नागरिक बनण्यासाठी तयार करत आहे, असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फॉरेन लँग्वेजेस शिकता याव्यात या उदात्त हेतूने ज्ञानदानाची सेवा गेली अनेक वर्षे अव्याहत करत असलेल्या भाषाशास्त्रातील पीएच.डी. प्राप्त डॉ. कृपा कुलकर्णी यांनी उपस्थितांशी बोलत असताना इतकी वर्षे या ठिकाणी येत असल्याचा आनंद आपल्या मनोगतातून व्यक्त केला. २०२४पासून सिनियर के.जी.च्या विद्यार्थ्यांनाही स्पॅनिश भाषा शिकवायला सुरुवात केल्याने हा आनंद द्विगुणित झाला असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले व या मुलांचे भरभरून कौतुक केले. त्याचबरोबर आपल्या अनुपस्थितीत परदेशी भाषांतील शब्दांची उजळणी लहानग्यांच्या गळी उतरवणाऱ्या पूर्व-प्राथमिक विभागातील शिक्षकांचेही मन भरून कौतुक केले व




*प्रमुख पाहुण्या डॉ. पार्वती हळबे यांच्या हस्ते जर्मन भाषा सर्वोत्तम विद्यार्थी पुरस्कार स्वीकारताना इ. नववीतील कु. समर्थ हेंबाडे*

आभार मानले.

प्रकल्प व्यवस्थापक वैशाली दाबके यांनी परदेशी भाषा का शिकावी? त्याचा काय फायदा होतो? हे सांगण्यासाठी एका उंदराच्या कुटुंबाची गोष्ट सांगितली. आपली भाषा कशा प्रकारे उपयोगी ठरते हे गोष्टीच्या माध्यमातून मांडले आणि एकतरी परदेशी भाषा शिकणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आज जर्मनी देशात खूप प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांनी जरूर जर्मन भाषा आत्मसात करा असे आवाहन करून विद्यार्थी व पालक यांना प्रोत्साहन दिले. यानंतर वर्षभरात घेण्यात आलेल्या जर्मन व स्पॅनिश भाषांतील स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

प्रमुख वक्त्या डॉ. पार्वती हळबे यांनी स्पॅनिश भाषेतून आपल्या मनोगताची सुरुवात केली. परदेशी भाषा शिकण्याची आपली आवड असून, कोव्हीड काळात तीन वर्षे स्पॅनिश भाषा शिकण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. भाषेचं जीवनातील महत्त्व सांगत असताना, मातृभाषा कन्नड असूनही मराठी माध्यमात शालेय शिक्षण व वैद्यकीय शिक्षण इंग्रजीतून झाल्याचे त्या म्हणाल्या. पेशाने बालरोगतज्ज्ञ असल्याने, बोलता न येणारे पण काहीतरी होत असल्याने रडणारे मूल जेव्हा पालक घेऊन येतात तेव्हा त्यांची अपेक्षा असते की एक डॉक्टर म्हणून ती भाषा त्यांना कळावी. लहान मुलांची 'Crying Language' त्यांना खूप चांगली समजते, त्यामुळे योग्य उपचार पद्धतीचा अवलंब करणे शक्य होते, तसेच किशोरवयीन मुलांच्या न




*जर्मन भाषेतून ॲक्शन सॉन्ग सादर करताना इ. पाचवीतील विद्यार्थी*




*स्पॅनिश भाषेतून गीत सादर करताना इ. सहावीतील विद्यार्थी*

उच्चारलेल्या भावना किंवा शब्द समजून घेण्यासाठी एक मध्यस्थ बनू शकते, असे त्या म्हणाल्या. परदेशी भाषा शिकण्याचे महत्त्व प्रकर्षाने विशद करत विविध भाषा आत्मसात केल्याने ज्ञानाची अनेक कवाडे आपल्यासाठी खुली होतात हे स्वानुभवातून त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमात जर्मन व स्पॅनिश भाषांतून बालगीते, शब्द अंताक्षरी, नृत्य, नाटिका, आदी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये परकीय भाषा शिकण्याविषयी आत्मविश्वास व रस निर्माण झाला.

कार्यक्रमानंतर विशेष पाहुण्या अलिसिया पॅद्रोस यांनी आपला अभिप्राय व्यक्त करताना विद्यार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांनो, तुम्ही खूप छान कार्यक्रम सादर केलात. मी खूप अभिमानाने सांगते की जरी तुम्ही युरोपपासून खूप दूर असलात, तरीही परदेशी भाषा शिकण्यात तुम्हाला रस आहे. भारतात तुम्हाला अनेक भाषा बोलण्याची सवय आहे, आम्ही युरोपमधील लोकांनी तुमच्याकडून शिकण्यासारखं बरंच आहे - विविधतेत एकता, एकत्र कसं राहावं आणि एकत्र कसं काम करावं हे आम्हाला शिकावं लागेल. आम्हालाही तुमची




*जर्मन आणि स्पॅनिश भाषेतून शाब्दिक अंताक्षरी सादर करताना विद्यार्थी*




*जर्मन लोकनृत्य सादर करताना इ. नववीतील विद्यार्थिनी*




*"It's a small world" गीत सादर करताना जर्मन आणि स्पॅनिश भाषेचे विद्यार्थी*

मदत लागेल कारण जर्मनी आणि इतर युरोपीय देश थोडे वयस्क होत चाललेत. तुम्ही जर जर्मन, स्पॅनिश किंवा अन्य परदेशी भाषा शिकत राहिलात, तर तुम्हाला खूप शिक्षणाच्या आणि नोकरीच्या संधी मिळतील आणि तुम्ही जगात कुठेही यशस्वी होऊ शकाल, असे विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका रिया महाडिक व परदेशी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी लीलया केले. प्रशालेच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर यांनी पाहुण्यांचे व उपस्थित पालकांचे आभार मानले. ‘वंदे मातरम’ गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# राज्यस्तरीय स्पर्धापूर्व फुटबॉल प्रशिक्षण शिबिर संपन्न

एसव्हिजेसीटी क्रीडासंकुलात, रत्नागिरी जिल्हा फुटबॉल असोसिएशन आयोजित १३ वर्षांखालील मुले व मुली आणि १७ वर्षांखालील मुलांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. १७ वर्षांखालील मुलांसाठीची राज्यस्तरीय स्पर्धा लोणावळा येथे दि. ११ एप्रिल २०२५पासून खेळविण्यात येणार आहे. तसेच १३ वर्षे वयोगटातील मुले व मुलींसाठीचे प्रशिक्षण शिबिर दि. १५ ते १७ एप्रिल २०२५ या कालावधीत डेरवण क्रीडासंकुल येथे आयोजित करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी निवडण्यात आलेले दोन्ही संघ वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेत सहभाग नोंदविणार आहेत.

या संघाचे प्रशिक्षक देवेंद्र साळवी, तर व्यवस्थापक विनोद म्हस्के हे प्रशिक्षण शिबिरासाठी उपस्थित होते. शिबिरासाठी निवड झालेल्या खेळाडूंना क्रीडासंकुलात असलेला जलतरण तलाव तसेच व्यायामशाळा यांचा तंदुरुस्ती वाढविण्यासाठी उत्तम उपयोग झाला. याचबरोबर वालावलकर फिजिओथेरपी कॉलेजच्या सहकार्याने खेळाडूंना त्यांच्या दुखपतींवर व्यायामाद्वारे मात कशी करावी याचेही प्रशिक्षण देण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्यातील उदयोन्मुख फुटबॉलपटूंना येथे मिळणाऱ्या सुविधांमुळे आपले कौशल्य वाढविण्यास मदत होत आहे, त्याचा फायदा आगामी स्पर्धा हंगामासाठी होईल अशी आशा व्यक्त करून जिल्हा फुटबॉलचे सचिव धनराज मोरे यांनी संस्थेचे आभार मानले.





*प्रशिक्षण शिबिरात कसून सराव करताना खेळाडू*

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035